## निशाणी १२ वरील आदेश

१. सदरचा अर्ज प्रतिवादी यांनी दिवाणी प्रक्रीया संहीता आदेश ७ नियम ११ प्रमाणे केलेला आहे.

२. वादी यांनी म्हणणे देवून सदर अर्जातील कथने नाकारली आहेत.

३. प्रतिवादीचे असे कथन आहे की, वादीने दावा कलम १२ मध्ये नमूद केलेल्या तपशीलाप्रमाणे वेगवेगळी आकारणी करुन वेगवेगळा मद्रांक शुल्क देणे आवश्यक आहे. तसा वेगळा मुद्रांक शुल्क दिला नसल्यामुळे सदर अर्जाने दावा नामंजूर (reject) करणेबाबत विनंती केली आहे.

४. सदर अर्जाचे चौकशीकामी सहायक अधिक्षक यांनी कोर्ट फी कायदा १९५९ कलम १८ नुसार वादीनी मागणी केलेले सर्व दादीची एकत्रीत आकारणी करुन त्यावर नियमाप्रमाणे मुद्रांक घेतलेला आहे असा अहवाल दिलेला आहे.

५. उभय पक्षकारांतर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

६. प्रतिवादीचे असे कथन आहे की, वादीनी दावा तपशील रक्कम रुपये ६८,०००/–वरती एकत्रीत रक्कम रुपये ५,५३०/– चा मुद्रांक शुल्क जमा केलेला आहे. परंतु वादीनी दावेची वेगवेगळी आकारणी करुन वेगवेगळे मुद्रांक शुल्क देणे आवश्यक आहे. सदर कथना अन्वये मुंबई कोर्ट फी कायदयाच्या तरतुदीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर कायदयाच्या कलम १८ नुसार एकाच दावेतील वेगवेगळया विषयांची एकत्रीत आकारणी करुन त्यावर एकत्रीत मुद्रांक देता येतो. त्यामुळे प्रतिवादीच्या दाव्याची वेगवेगळी आकारणी करुन वेगवेगळा मुद्रांक शुल्क देणे बाबतच्या कथनामध्ये तथ्य आढळून येत नाही. त्यामुळे सदरचा अर्ज फेटाळणेस पात्र आहे.

वरील सर्व परीस्थिती व कारणांचा विचार करुन खालील प्रमाणे आदेश पारीत करणेत येतो –

अ. अर्ज नामंजूर करणेत येतो.

सही/–

दिनांकः १९/११/२०१६ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,कुरुंदवाड